प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

मे २१, २०१२

**फिशिंग मेलबाबत आरबीआयचा सावधानतेचा इशारा.**

आरबीआयच्या असे नजरेस आले आहे की, तिच्या नावाने, alert@rbi.org ह्या ई मेल आयडीवरुन आरबीआय ऑनलाईनची सही असलेला आणि एक नवीन ऑनलाईन सिक्युरीटी प्लॅटफॉर्म देऊ करणारा एक ई मेल पाठविण्यात आला आहे. ह्या ई-मेलनुसार, ग्राहक दरवेळी इंटरनेट बॅंकिंगमध्ये लॉगइन करील तेव्हा त्याला/तिला, एका टु-वे ऑथेंटिकेशन फॅक्टरमधून जाण्यास सांगितले जाईल व त्यामुळे (ह्या नवीन ऑनलाईन सिक्युरीटी प्लॅटफॉर्ममुळे) इंटरनेट बॅंकिंगमधील ऑनलाईन ओळखीची चोरी होण्यास प्रतिबंध होईल. ह्यानंतर हा ई मेल, तो मिळणाराला ती ॲटॅचमेंट डाऊनलोड करुन अपडेट करावयास सांगतो.

रिझर्व बॅंक येथे स्पष्ट करत आहे की, तिच्याकडून असा कोणताही ई मेल पाठविण्यात आलेला नाही. खरे म्हणजे, तिच्याजवळ @rbi.org हे एक्सटेन्शन असलेले कोणतेही मेल आयडीज नाहीत. अशा मेल्स येणा-या लोकांनी ती ॲटॅचमेंट ओपन करु नये आणि/किंवा त्यांच्या कॉंप्युटरमध्ये ते डाऊनलोड करण्याचा प्रयत्न करु नये. ही एक फिशिंग मेल असू शकते आणि ती ॲटॅचमेंट डाऊनलोड केल्यामुळे तुमची ओळख चोरली जाऊ शकते.

**अल्पना किल्लावाला**
मुख्य महाव्यवस्थापक

**वृत्तपत्रांसाठी निवेदन २०११-२०१२/१८४९**

| **संबंधित वृत्तपत्र निवेदने/अधिसूचना** | |
|---|---|
| **ऑक्टोबर १५, २०१२** | आरबीआयच्या नावाने पाठविलेल्या फिशिंग मेलला उत्तर न देण्याबाबत आरबीआयचा जनतेला इशारा |
| **सप्टेंबर १४, २०१२** | तुमच्या इंटरनेट बॅंकिंग अकाऊंटबाबतची माहिती विचारणा-या मेल्सना उत्तर देऊ नका |
| **फेब्रुवारी ०६, २०१२** | खोट्या ऑफर्स बाबत आरबीआयचा जनतेला पुनश्च इशारा |
| **जानेवारी १०, २०१२** | विदेशामधील पैशांच्या खोट्या ऑफर्स विरुध्द स्थानिक पोलिस/सायबर गुन्हे प्राधिकरणांकडे तक्रार करा |
| **एप्रिल ५, २०११** | आरबीआय, तुमच्या बॅंक खात्याची माहिती कधीही मागत नाही |
| **फेब्रुवारी १५, २०११** | विदेशातून मोठा निधी मिळविण्यासाठी पैसे देऊ नका - आरबीआयचा सल्ला |
| **मे २८, २०१०** | निधी हस्तांतरणाबाबतच्या खोट्या ऑफर्सना बळी पडू नका - आरबीआयचा सल्ला |
| **मे २६, २०१०** | लॉटरी, पैसे फिरविण्याच्या योजना, स्वस्तातील पैशांच्या इतर खोट्या ऑफर्स ह्यासाठी धनप्रेषण |
| **जून ३०, २००९** | खोट्या ऑफर्स/लॉटारीची बक्षिसे/स्वस्तात मिळणारा पैसा ह्याबाबत सावध रहा |
| **डिसेंबर ०७, २००७** | परदेशातून स्वस्तात मिळणा-या धन प्रेषणाच्या खोट्या ऑफर्सबाबत आरबीआयचा जनतेला सावधानतेचा इशारा. |